म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय ना. वा.
दा. क्र. २०९९ 2090

2099

# नटश्रेष्ठ

IRBK-0102011
IRBK-0102011

# नटश्रेष्ठ

म. ग्रं. सं. ठाणें
षय नाट्य-वाङ्मय
. नं. १८



— पि. वि. जोशी

# नटश्रेष्ठ

पुरुषपात्री एकांकी नाटक

चिंतामण विनायक जोशी

२०१७
IRBK-0102011

१९४४

IRBK-0102011

# नटश्रेष्ठ

पुरुषपात्री एकांकी नाटक

चिंतामण विनायक जोशी

१९४४

किंमत १२ आणे

प्रकाशक व व्यवस्थापक:
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१, शनवार पेठ, पुणें २

संचालक:
भ. त्र्यं. देशमुख,
बी. ए., एल्‌एल्. बी.

(१) नाट्यप्रयोग, पुनर्मुद्रण, भाषांतर इ. अधिकार लेखकाधीन.
(२) मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.
(३) चित्राचे ब्लॉक बॉंबे प्रोसेसमध्यें तयार केले आहेत.

मुद्रक:
रा. का. तटणीस,
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

# प्रस्तावना

मराठी रंगभूमीच्या उत्सवाचीं वर्णनें वाचूनच मला दुधाची तहान ताकावर भागवावी लागली. सांगलीच्या महोत्सवास जरी मला हजर राहतां आलें नाहीं, तरी तेथें घडलेल्या भयंकर प्रकारांचीं वर्णनें वाचून आणि ऐकून तेथें आपण हजर राहूं शकलों नाहीं हें आपलें सद्भाग्य असें मला वाटूं लागलें. पुणें आणि मुंबई येथील उत्सवाचीं वर्णनें वाचून मात्र त्यांत भाग घेणाऱ्यांच्या सुदैवाचा मला हेवा वाटत असल्यास नवल नाहीं. आमचें बडोदें महाराष्ट्रापासून दूर असल्यानें आणि येथील मराठी लोकांची संख्या अल्प असल्यानें येथें मोठ्या प्रमाणांत हा उत्सव साजरा करणें शक्य नाहीं; म्हणून महाराष्ट्र रंगदेवतेच्या चरणीं, "सुवर्णार्थे तण्डुलान् समर्पयामि" असें बोलून ही फुलाची पाकळी अर्पण करीत आहें.

प्रस्तुत लहानशा नाटकाचें कथानक कविचरित्रांतलें आहे. त्याचा कथानायक जगन्नाथपुरीस होऊन गेला, ह्यापेक्षां अधिक ऐतिहासिक माहिती त्या ग्रंथांत मुळींच मिळत नाहीं. तथापि रंगभूमीवर नाटकें करण्याची आणि सूत्रधाराकडून भाषणें न म्हणवितां पात्रांनीं तीं स्वतः म्हणण्याची चाल हिंदुस्थानांत मध्ययुगांत देखील प्रचलित होती असें त्या कथेवरून स्पष्ट दिसतें. भूमिकेशीं तल्लीन होऊन मीपणा विसरलेल्या नटाची आणि त्याला यथायोग्य पारितोषक देणाऱ्या राजाची ही कहाणी मला इतकी चटकदार वाटली कीं तिच्यावर छोटेंसें नाटक रचण्याची उत्कट इच्छा मला झाली. भूमिकेशीं नटानें कोणत्या मर्यादेपर्यंत तादात्म्य पावावें हें ठरविण्याचा

प्रश्न तंत्रविदांचा आहे. पण अशी मर्यादा कोठें तरी असली पाहिजे हें खास. ह्या रेषेचें उल्लंघन झाल्यास रंगभूमीवर अनर्थ कोसळतील यांत शंकाच नाहीं. त्यांतल्या त्यांत स्त्रीपुरुषमिश्र नाट्यप्रयोगांत तर ही मर्यादा विशेष काळजीनें संभाळली पाहिजे. ऑथेल्लो नाटकाचा प्रयोग करीत असतां झुंजारराव जर कमळजेचा गळा दाबून खरोखरच तिचा प्राण घेऊं लागेल किंवा एखाद्या शृंगारप्रधान नाटकाचा नायक नायिकेशीं शृंगारचेष्टा करितांना अभिनय करण्याऐवजीं प्रणयचेष्टितें करूं लागेल, तर रंगभूमीचे बारा वाजण्यास वेळ लागणार नाहीं. पौराणिक नाटकांतील भीमानें दुःशासनाच्या छातीवर खरोखरीच पोकळ गदेचे जरी प्रहार केले, तरी दुःशासनाचें काम करण्यास पात्र मिळणें कठीण जाईल यांत शंका नाहीं. नटाचें भूमिकेशीं तादात्म्य झालें तरी तें सविकल्प असलेलें चांगलें.

तरीही सोंगाची बतावणी करतांना स्वतःला कसें विसरलें पाहिजे हें समजून घेणाऱ्या नटानें निर्विकल्प तादात्म्य पावलेला नट आदर्श या नात्यानें स्वीकारण्यास हरकत नाहीं. आदर्शाचें अनुकरण कठीण तर असतेंच, पण तें पुष्कळदा अनर्थावहही असतें. एकच प्याला नाटकांतील आदर्श आर्य पतिव्रता सिंधु हिच्या पत्यभिमानाचा अतिरेक कुटुंबाच्या संपूर्ण नाशाला कारण झालाच कीं नाहीं ? तशीच प्रस्तुत कथानकांतील नायकाची अतिरिक्त कलासक्ति एक वेळ दुसऱ्याच्या आणि नंतर स्वतःच्या नाशाला कारणीभूत झाली.

भूमिकेंत नट स्वतः रंगल्याशिवाय प्रेक्षक तींत रंगणें अशक्य आहे. प्रेक्षकांचेंही भूमिकेशीं तादात्म्य उत्पन्न करूं शकेल तो खरा नट. अशा एका जपानी नटाची सुंदर गोष्ट नुकतीच माझ्या वाचण्यांत आली ती येथें सांगितल्याशिवाय राहावत नाहीं. हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच जपानांत रंगभूमीवर स्त्रियांचीं कामें पुरुषच करितात. किकुनोजो नांवाचा स्त्रीनट ( वाटेल तर पुरुष-नटी म्हणा ) वयाला ७० वर्षें पूर्ण झालीं असतांही तरुण आणि सुंदर गैशे ( वेश्ये ) चें काम इतकें हुबेहूब करी कीं जपानी रंगभूमीच्या इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें आहे. एका रात्रीं प्रयोगाच्या आधीं

बराच वेळ वेषभूषा करून तो पडद्यामागें येरझारा घालीत होता. आपलें वार्धक्य त्याला दु:खद रीतीनें जाणवत होतें आणि रंगभूमीवरून अपमानास्पद प्रकारें आपली हकालपट्टी होणार अशी धास्ती वाटून त्याच्या निस्तेज झालेल्या डोळयांतून अश्रू ठिपकत त्याच्या गालावरील रंग पुसटून टाकीत होते. अशा वेळीं त्याच्या मागील बाजूची फलकभूमि करकरली. कोणी तरी चोरट्या पावलांनीं आंत आलें आणि त्यानें आपले दोन्ही हात किकुनोजोच्या गळयाभोंवतीं लपेटून, " माझ्या लाडके चोसान ! " असें म्हटलें. किकुनोजोनें त्याच्याकडे पाहिलें. तो नाट्यसंचालक होता. किकुनोजोला ओळखून त्यानें घाबरून पळ काढिला. ह्या वृद्ध नटाला पाठमोरा पाहून ही आपली आवडती गैशा चोसान आहे असा भास त्याला झाला होता.

वृद्ध स्त्रीनटाचा चेहरा प्रफुल्लित झाला. त्या रात्रीं सत्तराव्या वर्षी त्यानें इतकें सुंदर काम केलें कीं सतराव्या वर्षीदेखील तितका मोहक तो दिसला नसेल. खेळ संपल्यावर त्यानें नाट्यसंचालकाला आपल्याजवळ बोलावलें. संचालक घाबरतच त्याच्या समोर येऊन त्याची क्षमा मागूं लागला; पण किकुनोजो हासत म्हणाला, " बेट्या, क्षमा कशाला मागतोस माझी ? आज तूं मला पुन: तरुण केलं आहेस. हें घे तुला तुझ्या उपकाराचं बक्षीस, " असें म्हणून किकुनोजोनें त्याला एक हजार रायो किंमतीची नोट बक्षीस दिली. आरामखुर्चीवर अंग टाकून कागदी पंख्यानें वारा घेत तो उद्गारला, " खऱ्या कलावंताला वार्धक्य येत नसतं."

महाराष्ट्राच्या आतां वृद्ध झालेल्या नटश्रेष्ठाची आठवण ही गोष्ट वाचून झाली. डोक्याला टक्कल आणि चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेले हे नटवर्य बघून तरुण पिढीला त्यांच्या एका काळच्या अप्रतिम कामाची कल्पनाही येत नाहीं. बालगंधर्व वयाला चाळीस वर्षें होईपर्यंत उपवर झालेल्या रुक्मिणीचें किंवा तरुण भामिनीचें काम एखाद्या वीस वर्षे वयाच्या नटीप्रमाणें बेमालूम करीत असत. चाळीस वर्षांचा पुरुष पण विजेच्या दिव्यांच्या झगझगाटांत वेषभूषा करून रंगभूमीवर आल्यानंतर खरोखरच एखादी सुंदर युवती समोर येऊन उभी आहे असा भास होत असे. स्त्रिया रंग-

भूमीवर येऊं लागल्यानंतर सामान्य जनासही स्त्रीपुरुष-शारीर समजूं लागून हा स्त्रीत्वाचा आभास कायम ठेवणें त्यांना जड जाऊं लागलें. हे महान् नट भूमिकेशीं इतके एकात्म होत असत कीं वास्तव जगाचा त्यांना विसर पडत असे.

बडोद्याच्या एका मुक्कामांत "एकच प्याला" नाटकाचा प्रयोग चालू होता. बालगंधर्वांनीं सिंधूची भूमिका घेतली होती. त्यांचें स्वतःचें मूल मृत्युशय्येवर पडलें होतें. आजचा खेळ बंद ठेवा असें इष्टमित्र त्यांना सांगत होते, तरी त्यांनीं खेळ बंद ठेविला नाहीं. वास्तवसृष्टींतील आपल्या खऱ्या मुलाच्या मरणाचा शोक दाबून टाकून खेळांतील कचकड्याच्या बाळाच्या मृत्यूचा शोक त्यांनीं जो केला तो हृदयस्पर्शी ठरला. स्वतः कामाशीं तद्रूप झाल्याशिवाय नट प्रेक्षकांना तद्रूप बनवूं शकत नाहीं.

गणपतराव जोशी हे अशा प्रकारें प्रेक्षकांना देहभान विसरावयास लावीत असत. हॅम्लेट नाटकांतील नायक चंद्रसेन याचें आत्मगत भाषण ते करीत असतां रंगभूमीवर कारंजाचा आभास उत्पन्न करण्यासाठीं उभें ठेवलेलें चित्रित पुष्टिपत्र वाऱ्याच्या झुळुकेनें भुईवर पडलें; परंतु चंद्रसेनानें प्रेक्षकांचीं मनें आपल्या भावनोत्पादक भाषणांत इतकीं लीन करून टाकिलीं होतीं कीं तें भाषण पूर्ण होऊन दुसरें पात्र जेव्हां समोर दिसलें, तेव्हांच त्या कागदी कारंजाला घडलेला अपघात त्यांच्या ध्यानांत आला. हा नट तुकारामाचें सोंग घेऊन सत्त्वगुणाची बतावणी इतकी हुबेहूब करी कीं भाविक लोक त्याच्यापुढें भक्तीनें लोटांगण घालीत. 'मेकअप्'ची कला बाल्यावस्थेंत होती, तेव्हांचीं हीं उदाहरणें आहेत.

अशा प्रकारें प्रेक्षकांना नाट्यवस्तूंत गुंग करावयाचें असेल तर नटानें स्वतः गुंग झालें पाहिजे. मी अमुक अमुक मास्टर सोम्यागोम्या अन् ही मिस् साळू साळुंके अशी भावना नष्ट होऊन मी दुष्यंत किंवा चारुदत्त स्वतः असून ही माझी प्रेयसी शकुंतला किंवा वसंतसेना आहे अशी भावना जेव्हां नटांत उत्पन्न होईल, तेव्हांच त्याचें काम कलापूर्ण आणि जिव्हाळ्याचें

होईल. या भावनेला अर्थात् संयमाची जोड पाहिजेच. सर्कशींतील पशू ज्याप्रमाणें मंडलांत राहूनच आपलीं शक्तीचीं कामें करितात, त्याप्रमाणेंच आपल्याला नाटककारानें घालून दिलेल्या मर्यादेंतच अभिनयाची शिकस्त केली पाहिजे.

हा संयमाचा तोल सुटलेल्या एका नटवर्याची कथा दृश्यरूपानें मांडण्याचा हा यत्न आहे. नाटकांतील पोटनाटक मध्ययुगीन पद्धतीनें करावयाचें आहे. सर्व पदें सूत्रधारानें म्हणावयाचीं आहेत. पोटनाटक चालू असतां नाटकांतील प्रेक्षकनटांनीं भुईवर बसून पोटनाटक पहावयाचें आहे. खुर्च्यांवर बसून नाहीं! फक्त पुरुषपात्रांचीच योजना केल्यानें हें छोटें नाटक संमेलनादि प्रसंगीं उपयोजण्यांत येईल अशी आशा आहे.

पुस्तक लिहितांना रा. **शि. ब. कपोते** यांचें लेखनसाह्य झालें. त्यांचे आणि नेहमीं निकड लावून मजकडून पुष्कळ लिहून घेणारे तरुण प्रकाशक रा. **रा. ज. देशमुख** यांचे आभार मानितों.

अनंतचतुर्दशी,<br>संवत् २००० }

**चिंतामण विनायक जोशी**

# नटश्रेष्ठ

## ( एकांकिक प्रयोग )

## प्रवेश पहिला

( जगन्नाथपुरी. स्थळ न्यायासन. राजा आणि न्यायाधीश न्यायासनावर बसले आहेत. वेषधारी, दंडधारी, कायस्थ इत्यादि रीतीप्रमाणें. )

**दंडधारी** ( पुकारतो ) **:** श्रीमन्महाराज न्यायासनावर उपविष्ट झाले आहेत हो ! कोणाला कांहीं अर्थ सादर करायचा असला, तर त्यांनीं महाराजांच्या पुढें वाद मांडावा हो !

( गोपाळदास आणि अंबादास असे दोघे वाणिज प्रवेश करून राजास वंदन करतात. )

**गोपाळदास :** महाराजांच्या चरणीं मला आपला वाद सादर करायचा आहे.

**न्यायाधीश :** कायस्थ, लिहून घ्या. गोपाळदास श्रावक हे वादी. प्रतिवादी कोण आहे तुमचा, शेटजी ?

**गोपाळ :** नरहरिदासावर माझा वाद आहे, महाराज.

**राजा :** कोणत्या नरहरिदासावर ?

**गोपाळ :** महाराज, आपल्या जगन्नाथाच्या उत्सवांत होणाऱ्या नाटकांत नट होतो त्याच्यावर.

**राजा :** ( आश्चर्यानें ) काय ? नरहरिदास तुमचा प्रतिवादी आहे, शेटजी ? तो तर एक निरिच्छ साधु आपल्या पुरीचं भूषण आहे. त्या पुरुषानं तुमची काय हानि केली आहे बुवा ?

**न्यायाधीश :** त्याच्या हरिभजनानं शेटजींच्या रंगविलासांत व्यत्यय आला असेल !

**गोपाळ :** न्यायदेवता अशी अगोदरपासून नरहरिदासाचा पक्ष उचलून धरूं लागली, तर न्याय मिळण्याचा मार्गच खुंटला माझा !

**न्यायाधीश :** शेटजी, मीं हा नुसता विनोद केला.

**गोपाळ :** महाराज, आपल्या विनोदाला हंसण्यासारखी आमची मन:स्थिति नाहीं. नरहरिदासानं आमच्या सुखांत माती कालवली आहे.

**राजा :** ती कशी काय बोवा ? तुमचं दहापांच निष्कांचं ऋण त्यानं परत केलं नाहीं असं तुमचं म्हणणं आहे काय ?

**गोपाळ :** देवा, हा नरहरिदास एक वेळ उपाशी राहील, पण दुसऱ्याचं ऋण काढणार नाहीं. मग त्याच्यावर फेडण्याची पाळी कुठून येणार ?

**राजा :** त्याच्यासारख्या साधूच्या हातून कोणता अपराध घडणं शक्य आहे ? परस्त्रीचा अभिलाष कालत्रयीं त्याच्या हातून घडणार नाहीं.

**अंबादास :** स्वत:च्या स्त्रीला समाधानांत ठेवण्याची ज्याला अक्कल नाहीं, तो परस्त्रीचा अभिलाष कसला करतो ? ( उघड ) महाराज, असलं निंद्य आचरण त्याच्या हातून खरोखरच कधींहि घडणार नाहीं.

**न्यायाधीश :** मग काय नरहरिदासानं चोरी केली असा का तुमचा वाद आहे ?

**राजा :** साधूला बिचाऱ्याला चोरी तरी कसली करतां येणार ? फार तर कोणाच्या टाळचिपळ्या त्यानं चोरल्या असतील, नाहीं तर दुसऱ्या साधूनं रचलेल्या एखाद्या भजनाची चोरी केली असेल ! एवढ्याकरितां न्यायसभेला त्रास कशाला पाहिजे ?

**अंबादास :** देवा, नरहरिदासालाच इथं आपण बोलावून आणलं तर त्याच्याच तोंडून त्याचा अपराध वदवून घेतां येईल. आपला अपराध छपवणारा लबाड मनुष्य तो नव्हे—

**राजा :** ( दूतांस ) जा रे, भक्त नरहरिदासाला न्यायासनासमोर घेऊन या. ( गोपाळदासास ) शेठजी, तुमचा ह्या अपराधाशीं काय संबंध आहे ?

**गोपाळदास :** ज्या मनुष्याची हानि नरहरिदासाकडून झाली आहे, तो माझा अन् ह्या अंबादास शेठजींचा मेहुणा आहे. तो आतां जिवंत नसल्यानं आम्हींच वाद मांडला आहे, महाराज.

( दूत नरहरिदासाच्या मुसक्या बांधून त्यास घेऊन येतात. )

**राजा :** ( रागानें ) : मूर्खांनो, असल्या साधु पुरुषाला दोरीनं बांधून सामान्य चोराप्रमाणं इथं ओढीत आणण्यापूर्वीं तुम्हीं विचार करायला पाहिजे होता. सोडा त्याचीं बंधनं. ज्या राजाच्या राज्यांत थोर सत्पुरुषांना चौकशी केल्याशिवाय शृंखलाबद्ध करण्यांत येतं, त्याचं सिंहासन डळमळीत व्हायला मुळींच अवकाश लागत नाहीं. ( दूत त्याला बंधमुक्त करूं लागतात. )

**नरहरिदास :** दूत हो, थांबा; मला बंधनांतच राहूं द्या—मी महाराजांचा अपराधी आहें; त्या गोपाळदास आणि अंबादास ह्या

दोघां महाभागांचा मी अपराधी आहें. निरपराधी मनुष्य शृंखलाबद्ध करणं हें जसं राजाचं पातक असतं, तसाच अपराधी मनुष्य शृंखला-मुक्त ठेवणं हा त्याचा प्रमाद होतो.

**राजा :** साधुवर्या, तुझ्या हातून असा कोणता अपराध घडला आहे ?

**नरहरि :** महाराज, सर्वांत भयंकर असं पातक माझ्या हातून घडलेलं आहे.

**न्यायाधीश :** तुझ्या हातून पातक ! गंगाजलाच्या कलशांतून विष निघणं संभाव्य आहे काय ?

**नरहरि :** महाराज, ह्या चमत्कारपूर्ण जगांत कोणाच्या हातून काय होईल याचा नेम नसतो. धर्मराज एकदा जाणूनबुजून दुटप्पी बोलला होता, सती द्रौपदीची कर्णावर पापी दृष्टि गेली होती, आणि पुण्यश्लोक नलराजा देहधर्म उरकल्यानंतर पाय न धुतां—

**न्यायाधीश :** साधुवर्य, आपण न्यायासनासमोर उभे आहां. कीर्तन करायला देवळाच्या सभामंडपांत उभे राहिलां नाहीं हें ध्यानांत ठेवा. आपल्या हातून कोणता भयंकर अपराध घडला आहे तें थोड-क्यांत सांगा, म्हणजे शिक्षा देतांना आम्हांला थोडा सौम्यपणा दाख-वणं शक्य होईल.

**अंबादास :** आतां खालीं मान घालून मुकाट्यानं कां थांबला आहेस ? स्पष्ट सांगून टाक आपला प्रताप.

**नरहरि :** महाराज, माझ्या हातून नरहत्त्या घडली आहे !

**राजा :** काय नरहत्त्या ?

**न्यायाधीश :** अन् ती नरहरिदासाच्या हातून !

**राजा :** दुसऱ्या माणसाला झाडाचं फूल तोडतांना पाहून ज्याच्या डोळ्यांना पाणी येतं, त्या तुझ्या हातांनीं नरहत्त्या घडली असेल असं मला खरं वाटत नाहीं.

**अंबादास :** देवा, दुसऱ्याचा कठोरपणा पाहून ज्या डोळ्यांतून पाणी येतं, तेच डोळे स्वतःच्या कठोरपणाच्या वेळीं आपोआप मिटले जातात.

**राजा :** नरहरिदास, त्या नरहत्त्येचं वृत्त तूंच आपल्या तोंडानं कथन कर.

**नरहरि :** ऐकावं महाराज. भगवान् जगन्नाथाच्या उत्सवांत प्रल्हादविजय नाटक करायचं ठरलं. ह्या गोपाळदास शेठजीचा मेहुणा गोविंददास हिरण्यकशिपु झाला होता. आणखी मला नर-सिंहाचं काम देण्यांत आलं होतं.

**न्यायाधीश :** त्या वेळीं तूं कुठं बसला होतास ?

**नरहरि :** मी फळ्यांच्या केलेल्या पोकळ खांबांत बसलों होतों, महाराज. नाटक चालू असतां हिरण्यकशिपूनं प्रल्हादाला रागानं म्हटलं, " कारट्या, कुठं आहे तो तुझा नारायण ?"

**राजा :** मग प्रल्हाद काय म्हणाला ?

**नरहरि :** प्रल्हाद म्हणाला, " माझा नारायण सगळीकडे आहे. नारायणावांचून रिता ठाव भूमंडळांत नाहीं. स्थिरचर व्यापून तो उरला आहे. तो तुमच्या देहांत आहे, ह्या सिंहासनांत आहे, चव—रींत आहे—"

**न्यायाधीश :** समजलं, समजलं. प्रल्हादानं लांबलचक उत्तर दिलं; पण हिरण्यकशिपु पुढं काय म्हणाला ?

**नरहरि :** हिरण्यकशिपूनं विचारलं, ह्या खांबांत आहे का तुझा नारायण ? तशी प्रल्हाद म्हणाला, होय, ह्या खांबांत देखील नारायण आहे. त्यासरशी हिरण्यकशिपूनं—

**गोपाळदास :** म्हणजे आमच्या गोविंददासानं !

**राजा :** शेटजी, प्रतिवादीला बोलूं द्या. मध्यें अडथळा करूं नका.

**नरहरि :** हिरण्यकशिपूनं ज्यांत नरसिंह लपून बसला होता त्या खांबावर जोरानं लाथ मारली. लाथ मारतांच त्या खांबाचे तुकडे—

**अंबादास :** कारण तो खांब म्हणजे एक पोकळ पेटाराच होता, देवा ! ( राजा हात आपटून त्याला गप्प बसवितो. )

**नरहरि :** लागलीच नरसिंह खांबांतून प्रकट झाला. आणखी त्यानं हिरण्यकशिपूला मांडीवर आडवा घालून गर्जना केली, राक्षसाधमा, माझ्या भक्ताचा छळ केल्याबद्दल हें घे प्रायश्चित्त ! असं म्हणून नरसिंहानं आपलीं तीक्ष्ण नखं हिरण्य दैत्याच्या पोटांत रोवलीं.

**राजा :** नरहरि, तूंच नरसिंहाचं काम केलं होतंस ना ?

**नरहरि :** होय महाराज.

**राजा :** मग तुझ्या अंगांत इतकं बळ कुठून आलं ?

**नरहरि :** नरसिंह भगवन्ताची कृपा, महाराज !

**गोपाळदास :** वाहवा रे कृपा ! माझा मेहुणा जातो जिवानिशीं नि ह्या प्राणघातकावर भगवन्ताची कृपा ?

**नरहरि :** झाला प्रकार फार शोचनीय झाला, पण माझ्या नकळत झालं सगळं, शेटजी !

**न्यायाधीश :** आपसांत बोलूं नका. हें न्यायासन आहे, गांवाची चावडी नाहीं. नरहरिदास, तुझीं नखं पाहूं ? ( तो दाखवितो ). हीं नखं त्याच्या पोटांत कशीं रोवलीं गेलीं ? हीं तर बोथट दिसताहेत.

**नरहरि :** खोटीं पण तीक्ष्ण नखं त्या वेळीं माझ्या बोटांना लावलेलीं होतीं, तीं हिरण्यकशिपूचं काम करणाऱ्या बिचाऱ्या गोविंददासाच्या पोटांत शिरलीं.

**न्यायाधीश :** ( स् स् असा आंवाज काढून ) अरेरे, मग तो किंकाळूं नाहीं का लागला ?

**गोपाळ :** हो ! केवढी हृदयभेदक किंकाळी त्यानं फोडली ! सगळ्या प्रेक्षकांच्या पोटांत चर्रर्र झालं !

**न्यायाधीश :** तरी देखील तूं त्याला सोडलं नाहींस नरहरि ?

**नरहरि :** नाहीं, न्यायदेवा. त्याची किंकाळी नाटकांतलीच आहे असं मला वाटलं.

**अंबादास :** गोविंददासाचीं आंतडीं बाहेर आलीं, तरी देखील ह्या क्रूरानं त्याला सोडलं नाहीं, देवा !

**राजा :** होय का रे साधुवर्या ?

**नरहरि :** महाराज, तो गोविंददास आहे, मी नरहरिदास आहें अन् हें रंगभूमीवरचं काम आहे असं मला भान राहिलं नाहीं. मी प्रल्हादाचा पाठीराखा भगवान् नरसिंह अन् तो दुष्ट राक्षस हिरण्य-

कशिपुच आहे अन् आम्ही त्रेतायुगांत अवतरलों आहों असा अभिनिवेश माझ्या ठिकाणीं उत्पन्न झाला होता. आपण अभिनय करीत आहों हें मी पूर्णपणें विसरून गेलों होतों.

**राजा :** मग तुझ्या लक्षांत केव्हां आलं कीं हा सगळा अभिनय आहे असं ?

**नरहरि :** जेव्हां घाईनं पडदा पाडण्यांत आला, आणखी लोकांनीं त्याला माझ्या हातून ओढून काढलं, तेव्हांच प्रभो, माझ्या ध्यानांत आलं कीं मी नरसिंह नसून एक क्षुद्र नट आहें !

**गोपाळ :** फारच लवकर ध्यानांत आलं ह्याच्या !

**राजा :** खरोखर आपण घेतलेल्या भूमिकेशीं इतकं तादात्म्य होऊन आपलं सोंग वठवणारा नट कलेच्या दृष्टीनं श्रेष्ठ समजला पाहिजे.

**गोपाळ :** महाराज, कलेपेक्षां व्यवहार श्रेष्ठ आहे. माझा गरीब बिचारा मेहुणा, त्याचा अपराध काय, तर त्यानं एका राक्षसाचं सोंग घेतलं होतं. पण तो बापुडा एका नरदेहधारी राक्षसाच्या क्रूर वृत्तीला बळी पडला.

**न्यायाधीश :** नरहरिदास, तुझं अन् गोविंददासाचं भांडणं झालं होतं काय ?

**नरहरि :** महाराज " निर्वैरः सर्वभूतेषु " अशा वृत्तीचा मनुष्य मी आहें. माझ्याशीं कोणाचंहि वैर असूं शकत नाहीं. गोविंददास माझा परममित्र अन् संवगडी होता. मीं गोविंददासाचा वध केला

नाहीं, हिरण्यकशिपूचा केला. आपण कलादृष्टीनं माझ्या अपराधाकडे पाहा.

**गोपाळ :** कलेची दृष्टि मनुष्याला केव्हां गोड वाटते ? कलेची झळ आपल्या अंगाला जोंपर्यंत लागली नाहीं, तोंपर्यंतच कला गोड वाटते. अग्निक्रीडा सुंदर खरी; पण आपल्या नगरीवर तिचा प्रयोग चाललेला पहाणं कोणाला आवडेल ?

**अंबादास :** कलेच्या उन्मादांत मनुष्यवध करणाराला उत्कृष्ट कलाकृतीच्या सुळावर चढवावं, देवा.

**गोपाळ :** ह्यानं हिरण्यकशिपूला मारलं असो किंवा गोविंददासाला मारलं असो, मनुष्यवधाच्या आरोपांतून नरहरिदासाची सुटका व्हायची नाहीं. नाटकांतले राम नाटकांतल्या रावणांना, नाहीं तर नाटकी कृष्ण नाटकी कंसांना खरोखरच जिवें मारूं लागले, तर नाट्यकला जीवंत रहाणारच नाहीं. महाराज, ह्या साधूचं नाटकी भाषण आपण मनावर घेऊं नका. मला न्याय द्या. नरहरिदासाचं पारिपत्य आपण केलंच पाहिजे अशी माझी महाराजांच्या चरणापाशीं मागणी आहे.

**राजा :** पंडितजी, तुमचं काय मत आहे या वादांत ?

**न्यायाधीश :** महाराज, हा वध जाणून बुजून केला आहे म्हटलं तरी चालेल, चुकून केला आहे म्हटलं तरी चालेल. अशा प्रकारचे पेंचप्रसंग ही कार्याकार्य विवेकाची कसोटीच आहे.

**गोपाळ :** अशी उडवाउडवी राजकारणांत शोभते, न्यायदानांत नाहीं, न्यायदेवा !

**न्यायाधीश :** शेटजी, न्यायदेवतेला शहाणपण शिकवूं नका. महाराज, आरोपी म्हणतो, हिरण्यकशिपूचा वध नरसिंहानं केला; अर्थात् नरसिंह शिक्षेला पात्र आहे.

**राजा :** देवाला आपण काय शिक्षा करणार, पंडितजी ?

**न्यायाधीश :** न्यायदेवतेपुढं देव आणि मनुष्य, ब्राह्मण आणि चांडाल, स्त्री आणि पुरुष असा भेद नाहीं. नरसिंहाचं काम करणाऱ्या नटाला शिक्षा झालीच पाहिजे असा माझा निर्णय आहे.

**नरहरि :** महाराज, न्यायदेवता सांगेल ती शिक्षा भोगायला मी आनंदानं सिद्ध आहें. मला शासन करायचं तें माझ्या अपराधाला साजेल असंच करावं अशी माझी मागणी आहे.

**राजा :** म्हणजे कसं बुवा ?

**नरहरि :** देहभान विसरल्यावर झालेल्या अपराधाचं शासनहि मी देहभान विसरल्यावरच व्हावं, महाराज !

**राजा :** ठीक आहे. पंडितजी, शेटजी आणि साधुवर्य, तुमचं सगळ्यांचं समाधान होईल अशी शिक्षा मी नरहरिदासासाठीं योजतों. जगन्नाथजीच्या पुढल्या उत्सवाच्या वेळीं त्याला शिक्षा देण्यांत येईल.

**अंबादास :** देवा, आरोप्याच्या साधुत्वाची कीर्ति ह्या विलंबाचा लाभ घेऊन त्याला न्यायदेवतेच्या कोपांतून सोडवणार नाहीं ना ?

**राजा :** नाहीं. साधुत्वाची ढाल आम्ही त्याला वापस देणार नाहीं. स्वतः घेतलेल्या भूमिकेच्या तन्मयतेनंच त्याला आपोआप शिक्षा होईल अशी आम्ही योजना करूं. त्या भूमिकेशीं तो तन्मय झाला नाहीं, तर

जिवंत राहील; पण त्याच्यांतला नट मेला आहे अशी जनाची खात्री होईल.

**नरहरि :** त्यापेक्षां मृत्यु पत्करला, महाराज. संभाविताची अकीर्ति मरणाहून वाईट असते.

**राजा :** आमच्यावर विश्वास ठेवा, शेटजी. याला शिक्षा केल्याशिवाय आम्ही रहात नाहीं; पण सामान्य बंदीजनाप्रमाणं याला बंधनांत कशाला ठेवतां ? सोडा रे याचीं बंधनं ! ( त्याच्या मुसक्या सोडल्या जातात. )

**अंबादास :** महाराजांच्या न्यायीपणाचा विजय असो ! साधूपणाच्या ढोंगाखालीं आपलं व्यक्तिगत वैर साधणारा हा स्वार्थसाधु आहे कीं भूमिकेशीं तादात्म्य पावणारा नटश्रेष्ठ आहे हें पुढल्या उत्सवांत जगाला दिसेलच.

**गोपाळ :** ( अंबादासास ) कसलं आलं आहे तादात्म्य, तल्लीनता नि तन्मयता ? मोठाले शब्द वापरून लोकांच्या डोळ्यांत धूळ घालायची करामत आहे सगळी झाली ! ( पडदा ).

ठाणे; वाचनालय
क्र. २०१० ता.

# प्रवेश दुसरा

( स्थळ–नाटकगृह. रंगभूमीच्या पार्श्वभागीं उपरंगभूमि आहे. पुरोभागीं प्रेक्षक-विभाग त्यांत राजा, न्यायाधीश गोपाळदास आणि अंबादास असे उपप्रेक्षकांची पुरवणी असें समजण्यास हरकत नाहीं. उपप्रेक्षक पौराणिक पद्धतीच्या आसनांवर मांड्या घालून बसवावे. खुर्च्यांवर नव्हे. उपरंगभूमीचा पडदा पडलेला आहे. )

**राजा :** गोपाळदासशेट, आजचं हें नाटक कोणत्या कारणानं योजलं आहे हें तुला माहित आहे का ?

**गोपाळ :** महाराजांनीं वचन दिल्याप्रमाणं नरहरिदासाला शिक्षा करण्याकरितां हें नाटक योजलं असावं असा माझा विश्वास आहे.

**अंबादास :** देवा, म्हणजे आज नरहरिदास हिरण्यकशिपु होणार अन् नरसिंह त्याचं पोट फोडून टाकणार, असंच कीं नाहीं ?

**राजा :** नरहरिदासारख्या साधूचा वध करायला कोणता नट सिद्ध होईल ? आज निराळंच नाटक योजलं आहे न् तें असं योजलं आहे कीं, नरहरिदास जर आपल्या भूमिकेशीं तन्मय होणारा जातिवंत नट असला, तर हें त्याच्या आयुष्यांतलं शेवटलं काम ठरेल !

**न्यायाधीश :** तसं नाहीं ठरलं तर ?

**राजा :** तर तो खोटा नकली नट ठरेल.

**न्यायाधीश :** अर्थातच त्यानं हिरण्यकशिपूचं काम करणाऱ्या नटाला बुद्ध्या मारलं असं सिद्ध होईल ! दिव्यच आहे हें, महाराज.

**अंबादास :** महाराजांनीं असं कोणतं आख्यान निवडलं आहे आजच्या खेळासाठीं, देवा ?

**राजा :** कळेल, लौकरच पडदा उघडल्यावर सूत्रधाराच्या तोंडून तुमची जिज्ञासा तीव्र झाल्यानंतरच तिची तृप्ति करण्यांत मजा आहे. जिज्ञासेचं टोंक बोथट केल्यानं नाटक बेचव होतं म्हणून त्याचं नांव अगोदर प्रसिद्ध करीत नाहींत. ( नगारा वाजूं लागतो. ) आतां आपण सगळे खालीं बसूं या. नाटकाला आतां आरंभ होईल.

( नगारा संपतांच उपनाटकाचा पडदा एक मुलगा आणि एक मुलगी हातांनीं बाजूला सरकावितात. उपरंगभूमीवर सूत्रधार आणि दोन पारिपार्श्वक उभे आहेत. सूत्रधाराच्या हातांत झांजा आहेत. ते पुढील पद म्हणतात. )

**भूप त्रिताल**

**जय नटराया कलाविधात्या ।**
**सत्‌चित्‌स्वरूपा पसरिसि माया ॥**
**विस्मरवोनी आत्मत्वासी**
**तदाकार वृत्तीतें देसी ॥**
**रंगसृष्टिवरि मोह टाकुनी**
**करविसि तन्मयतेनें करणी ॥**
**जय नटराया...**

( पारिपार्श्वक जातात. )

**सूत्रधार :** श्री भगवान् जगन्नाथजीच्या उत्सवाप्रीत्यर्थ आज करून दाखवायच्या नाट्यप्रयोगांत आधीं नटराज शंकराचं तर स्मरण केलंच, आतां दुसऱ्या कोणत्या देवाला आवाहन करावं बरं ?....हां. त्या विघ्ननाशक गजाननाचं स्मरण करणं हेंच योग्य आहे. कारण आम्हां नाटककारांच्या समोर धनको, गांवगुंड, राजाचे दंडधारी,

आणखी नटांचीं प्रेमपात्रं अशीं सत्राशेंसाठ विघ्नं सदोदित टपून बसलेलीं असतात. नकटीच्या लग्नाला सत्राशें विघ्नं येत असलीं, तर नाटक्याच्या नित्याच्या व्यवहाराला त्याहून साठ अधिकच येतात, महाराज ! आज हा नट रुसला, तर उद्यां स्वयंपाकी पळाला, तर परवां धनकोनं येऊन रंगपट स्वाधीन करून घेतले, अन् तेरवां पाऊस पडून मंडपच कोसळला ! अशा विघ्नांतून सुटण्याकरितां

**बागेसरी—झपताल**

**जिंकीत जो पाणि श्रीशारदेचा**
**लिपिकार झाला परि भारताचा ।**
**चन्द्रासि ज्यानें दिधल्या कला त्या**
**वन्दीं गणेशा यशलाभ व्हाया ॥**

अहाहा, स्मरण करतांच गणेश महाराज भक्ताला दर्शन द्यायला—

**गणपति :** ( प्रवेश करून ) काय रे भरतपुत्रा, आज इतकं काकुळतीनं कां आव्हान केलंस ? मोदकबिदक सिद्ध केले आहेत कीं काय मंडळीच्या बिऱ्हाडीं ? तुम्ही काय बुवा, खास राजाश्रयाखालची मंडळी. घृतकुल्ल्या, मधुकुल्ल्या वाहात असतील पानांतून नुसत्या !

**सूत्रधार :** आमचं कार्य निर्विघ्न पार पडूं द्या, म्हणजे पोटभर मोदक देऊं तुम्हांला खायला, गणराया ! ज्या शारदेच्या कृपाकटाक्षाकरितां आम्ही मानव तपंच्या तपं हाडाचीं काडं करतों, ती तुमची पत्नी आहे, विनायका ! ( गणपति चुळबूळ करूं लागतो ). देवा, तुमची ही शुंडा प्रणवचिन्ह आहे ( गणपति धांदल करतो ).

## साकी

**शुंडादंडीं ओंकाराचें साजे लक्षण शुभसें ।**
**दंशाचंचु जणुं येइ उभारुनि वृश्चिक दंशामिषें ॥**

**गणपति :** अरे लेका, जणुं येइ कसला ? हा बघ खरोखरचा विंचू आहे या सोंडेवर ! ( गणपतीचें पात्र कृत्रिम सोंड काढून टाकून नेपथ्यांत पळून जातें. उपरंगभूमीचा पडदा सरकविण्यांत येतो. प्रेक्षकांत हशा पिकतो. )

**अंबादास :** वाहवा रे गणपति, विंचवाला कीं हो भ्याला, देवा !

**राजा :** हाच नरहरिदास गणपतीचं काम करीत असता तर विंचू चावल्याची दाद देखील त्यानं घेतली नसती. गणपतीचं सोंग घेणारा माणूस अगदीं कलाशून्य दिसतो. त्याला मीपणा टाकतां आला नाहीं.

**गोपाळ :** त्याचं तादात्म्य झालं नाहीं ! ( नगारा वाजतो व उपरंगभूमीचा पडदा उघडतो ).

**राजा :** ऐका, पुनः नाटक चालू झालं.

**सूत्रधार :** मीं आराधना केली गणपतीची अन् हा सोंगाड्या माझ्यापुढं येऊन उभा राहिला ! असो. अद्याप माझा मित्र विदूषक कां बरं आला नाहीं ? तो पहा, आठवण काढतांच उपस्थित झाला. अरे मित्रा, तुला शंभर वर्षं आयुष्य आहे !

**विदूषक :** ( प्रवेश करून ) कां रे बाबा, असला शाप मला कां देतोस ? मीं काय तुझं गाढव मारलं होतं ?

**सूत्रधार :** अरे मित्रा, चांगला शंभर वर्षं जगशील म्हणून आशीर्वाद दिला, तर त्याला शाप कां म्हणतोस ?

**विदूषक :** सित्रा, मूत्रधारा—

**सूत्रधार :** काय म्हणालास ? नीट बोल.

**विदूषक :** चुकलों चुकलों, मित्रा सूत्रधारा, तीस वर्षांच्या वयांतच मला आयुष्याचा कंटाळा आला आहे. नित्य त्या पुरणपोळ्या, ते मोतीचुराचे लाडू अन् तो केशरीभात गिळून जीभ कशी विटून गेली आहे. कांहीं तरी बेट्या रुचिपालट नको का व्हायला ?

**सूत्रधार :** रुचिपालट हवा म्हणूनच मीं हें नवीन नाटक करायचं योजिलं आहे. नव्या नाटकाकरितां आज ह्या नगरीच्या भूपालासह इतके रसिकजन गोळा झाले आहेत.

**विदूषक :** अरे वाः नाटकाला कधीं न जाणारी न्यायदेवता सुद्धां आज इथं प्रस्थित झालेली दिसते आहे ! पण मला रुचिपालट हवा आहे तो पक्वान्नांचा हवा, नाटकाचा नको.

**सूत्रधार :** वेड्या, आज आपल्या अयोध्यानगरीवर केवढा दुःखाचा प्रसंग येऊन कोसळला आहे, आणखी तूं आपला नेहमीप्रमाणं खाण्याच्या गोष्टी करीत बसला आहेस ! कैकेयी मातेनं प्रभु रामचंद्राला पित्याच्या वराची आठवण करून दिली—

**विदूषक :** आठ वण का नऊ वण ?

**सूत्रधार :** पुरे झाला तुझा विनोद, मूर्खा ! ते पहा वनवासाला जायला सिद्ध झालेले प्रभु रामचंद्र, आणखी ते पुत्रवियोगाच्या कल्पनेनं होरपळणारे दशरथ महाराज. ह्या शोकप्रसंगीं तुझा कांहीं उप-

योग नाहीं ( विदूषक रागानें पाय आपटीत जातो. उपरंगभूमीवरील मागला पडदा सरकतो. ).

( दशरथाचें सोंग घेतलेला नरहरीदास पलंगावर बसून शोक करीत आहे.
समोर राम उभा आहे. सूत्रधार पुरोभागीं एका कोंपऱ्यांत
झांजा घेऊन उभा रहातो. )

**राम** : पिताजी, तिसऱ्या मातेनं मला सगळा वृत्तांत सांगितला आहे. आपण तिला वर दिला, तिनं माझ्या वनवासाची अन् भरताच्या राज्याभिषेकाची मागणी केली. तात, राजा होण्यापेक्षां पित्याच्या वचनाचं पालन करणं मला अधिक प्रिय आहे. हा पहा मी राजभूषणांचा त्याग करून आपला निरोप घ्यायला परत इथं येतों. ( नेपथ्यांत जातो व भूषणरहित होऊन पंचा नेसून धनुष्य-बाण घेऊन परत येतो. )

**दशरथ :** बा रामचंद्रा, आपलीं सगळीं वस्त्रंभूषणं टाकून नुसतं वल्कल नेसून तुला इथं उभा राहिलेला पाहून मला भडभडून येत आहे. बाळा, तुझ्या फुलासारख्या सुकुमार देहाला वनवासाचे कष्ट द्यायचे मान्य करणारी ही दुष्ट जीभ मी अशी हासडून टाकतों ( तसें करावयास जातो, पण राम त्याला अडवतो. )

**राम :** पिताजी, हें काय ? तुम्ही जिव्हेला दोष देऊं नका. सर्व कांहीं पूर्वसंकेताप्रमाणं घडत असतं. वनवासांत माझ्या हातून कांहीं तरी महत् कृत्य व्हावं अशी विधिघटना असेल. बाळपणीं विश्वामित्र ऋषीबरोबर नव्हतों का आम्ही अरण्यांत गेलों ? त्या समयीं आमच्या हातून असुरसंहार होऊन यज्ञांचं संरक्षण झालं, त्याप्रमाणंच ह्या वेळीं होणार असेल.

**दशरथ :** बाळ, तेव्हां देखील मला काय कमी वाईट वाटलं होतं ? आतां तर तुझं नुकतचं लग्न झालं आहे आणि गृहस्थाश्रमा-ऐवजीं अकालींच वानप्रस्थाश्रम तुला पत्करावा लागणार, हें मला कसं बरं आवडेल ?

**राम :** तात, मला अरण्यांत जाण्यांत मुळींच कष्ट वाटत नाहींत. उलट त्या नगरांतल्या गर्दीचं आणि गडबडीचं जीवन माझ्या जिवाचा कोंडमारा करीत होतं, त्यांतून माझी सुटका होईल.

**दशरथ :** रामा, येऊन पडलेल्या प्रसंगाला तोंड देण्याचं तुझं व्रतच आहे. पण त्या रानांतल्या कांट्याकुट्यांतून आपला मार्ग कसा काढशील ? तिथं रानांत तुझ्या हाकेला ओ द्यायला दासदासी कुठून येणार ? तूं वनवासाला जाऊं नको.

**राम :** तात, वनवासांत खरोखरच मोठं सौख्य भरलेलं असतं म्हणूनच ऋषि, मुनि अरण्यवास पसंत करतात. मीही अरण्यवासाचा मोठ्या आनंदानं उपभोग घेईन.

**लक्ष्मण** ( प्रवेश करून ) **:** दादा, त्या वनवासाचा उपभोग मी तुला एकट्याला घेऊं देणार नाहीं. भावाची वांटणी तूं मला दिलीच पाहिजे; मला नेशील ना आपल्याबरोबर ?

**दशरथ :** लक्ष्मणा, तूंहि निघालास का त्याच्याबरोबर ? अरे, मला म्हातारपणीं एकट्याला टाकून तुम्ही कुठं जातां ? तुम्ही दोघेहि इथंच रहा. तुमच्यावांचून मीं जगणं म्हणजे पाण्यावांचून माशानं जिवंत राहण्यासारखंच अशक्य आहे.

**राम :** पिताजी, मी इथंच राहिलों, तर तुम्ही कैकेयी मातेला दिलेल्या वचनाचं काय करायचं ?

**दशरथ :** समुद्रांत गेलं तें वचन ! वचन मोडल्याचं पाप मला लागेल. त्यामुळं भोगावा लागणारा नरकवास मी आनंदानं भोगीन, पण माझ्या लाडक्या रामाला अरण्यांत पाठवणार नाहीं. यमधर्मा, त्याबद्दल वाटतील त्या यातना मला भोगायला लाव, पण माझ्या आवडत्या पुत्राच्या केसालाहि धक्का लागलेला मला खपणार नाहीं. रामा, ठरलं माझं. त्या तुझ्या कलि संचरलेल्या सापत्न मातेला दिलेलं वचन मी परत—

**राम :** थांबा थांबा, तात. खोट्या पुत्रवात्सल्याला बळी पडून आपल्या बेचाळीस पिढ्या नका लोटूं नरकांत. वचनभंग करणारा क्षत्रिय एकटाच नरकांत जात नाहीं. आधींच्या आणि नंतरच्या बेचाळीस पिढ्यांना बरोबर घेऊन तो युगानुयुगं नरकांत खितपत पडतो.

**दशरथ :** बाळांनो, तुमचा वियोग मी कसा सहन करूं ? संध्याकाळीं खेळून परत यायला तुम्हांला घटकाभर उशीर लागला तरी माझा जीव खालींवर व्हायला लागतो. अशा मला तुमचा चवदा वर्षांचा विरह जिवंत तरी ठेवील का रे ?

**लक्ष्मण :** तात, चवदा वर्षं हां हां म्हणतां निघून जातील. आमच्या जन्मापासून आतांपर्यंत झालेलीं सोळा वर्षं सोळा घटकांपेक्षां उणीं वाटलीं असं तुम्हीच म्हणत असतां सगळ्यांच्या जवळ. चौदा वर्षं पूर्ण होतांच आम्ही असूं तेथून तुमचे चरण धरायला पळाचाहि विलंब न लावतां धावत येऊं.

**दशरथ :** मुलांनो, तुमच्या सहवासांतलीं सोळा वर्षं मला सोळा पळांप्रमाणं चमकून गेल्यासारखीं वाटलीं. आतां तुमच्यावांचून

जाणारं प्रत्येक पळ एकेका संवत्सराइतकं लांबलचक अन् कंटाळवाणं वाटेल. अशा साठ पळांची एक घटका, साठ घटकांचा एक दिवस, तीनशेंसाठ दिवसांचा एक वर्ष अन् अशीं च-व-दा वर्षं ? ( बोटांनीं मोजून वेडे चाळे करतो ).

**राम :** तात, असा धीर सोडूं नका; पुत्रमोहानं खचून जाणं तुमच्यासारख्या ज्ञानी पुरुषाला शोभत नाहीं. तत्त्वज्ञानी जनक राजाचे तुम्ही मित्र आणि व्याही आहां, पुत्रशोक संयमांत ठेवणाऱ्या वसिष्ठ ऋषींचे शिष्य आहां. आपण आपल्या ज्ञानावर सांचलेली पुत्रमोहाची राख झटकून टाका.

**दशरथ :** बाळा, तुझ्यासारखे गुणी पुत्र ज्याला लाभले आहेत त्याला तत्त्वज्ञ होण्यापेक्षां प्रेमळ पिता रहाणंच अधिक आवडेल. रामा, अयोध्येचं राज्य तुझं आहे. तूं ज्येष्ठ पुत्र असल्यानं ह्या सिंहासनाचा अधिकार तुझाच आहे. हें ऐश्वर्य भोगण्याकरितांच ज्येष्ठ महाराज्ञीच्या पोटीं तुझा जन्म झाला, बापानं स्त्रैणपणाच्या भरांत सावत्र आईला दिलेल्या वचनानं तूं बांधला जात नाहींस.

**राम :** तात, क्षत्रियाचं जिणं ऐश्वर्य भोगायला प्राप्त झालेलं नसतं, तें एक असिधाराव्रत आहे. तें व्रत पालन करणाराच्या मागं ऐश्वर्यच हात धुऊन लागलेलं असतं; मी तुमचा शब्द खरा करण्या-करितां वनवासाला निघत आहें. भरताला हें राज्य उपभोगूं द्या. तोही तुमचा पुत्रच आहे. वनवास पूर्ण झाल्यावर मी स्वत:साठीं वेगळं राज्य स्थापन करीन.

**दशरथ :** रामा, आजचा प्रसंग उद्भवण्यापेक्षां मी पुत्रकामेष्टि यज्ञ केला नसता तर बरं झालं असतं. 'तुला पुत्रशोकानं मरण येईल' हे ब्राह्मणाचे शब्द मला त्या वेळीं आशीर्वादाप्रमाणं शुभदायक वाटले; पण आतां त्या शापवाणीची खरी कठोरता माझ्या अंतःकरणाला जाणवत आहे. माझं अंतःकरण कोणी कापून नेत आहे असा मला भास होत आहे. ( काळीज हातांनीं दाबतो. राम जवळ जाऊन सेवा करूं लागतो. ) रामा, तुझ्या ह्या रोमांचकारी सुखद स्पर्शाला मी मुकूं का रे? बस् मी तुम्हां दोघांना धरून ठेवतों. कसे जाल तें पहातों. ( हंसूं लागतो. )

**राम :** ( लक्ष्मणाला )—लक्ष्मणा, ह्यांचं डोकं क्षुब्ध झालेलं दिसतं. ( मोठ्यानें ) कोण आहे रे तिकडे? राजवैद्यांला बोलावून आणा. ( राजवैद्य येतो. ) वैद्यबाबा, तातांचं मस्तक शांत होईल अशी कांहीं तरी मात्रा त्यांना द्या.

**राजवैद्य :** महाराज, नाडी पाहूं द्या तुमची? ( दशरथाची नाडी बघण्यास त्याचा हात धरतो. पण दशरथ हात हिसडून देतो. )

**दशरथ :** थेरड्या, तूं कशाला माझा हात धरतोस? माझा प्राणापेक्षां प्रिय राम मला सोडून अरण्यांत जायला निघाला असतां तुझ्या हस्तग्रहणानं माझं थोडंच समाधान होणार?

( पडद्यांतून कैकेयीचा आवाज ) : रामा, काट्र्या, अजून तूं अयोध्येंतून काळं केलं नाहींस ना? सिंहासनाचा लोभ सुटत नाहीं वाटतं, मेल्या? जर तूं क्षत्रियाच्या पोटचा असशील, तर बापानं दिलेलं वचन तत्काळ खरं करून दाखवशील.

**दशरथ :** चांडाळणी, तुला आपल्या पतीचा जीव नकोसा झाला आहे वाटतं ? राणी राहण्यापेक्षां राजमाता होण्याची इच्छा तुला प्रबल झालेली दिसते.

**राम :** आई, तूं चिंता करूं नको. मी आतां इथं रहात नाहीं. तातांच्या अवस्थेमुळें ह्या राजवाड्यांत माझे पाय क्षणभर घुटमळले म्हणून मला क्षमा कर. वनवासांत सुद्धां तुझा आशीर्वाद सदैव माझ्या डोक्यावर असूं दे. तात, माझा प्रणाम घ्या. चौदा वर्षांनीं पुनः दुसरा प्रणाम करायला येईन. ( जातो )

**लक्ष्मण :** तात, दादाच्या सोबतीला मी जातों. मलाहि आपला आशीर्वाद द्या. ( जातो. )

**दशरथ :** तुमचं कल्याण असो ! ( जरा थांबून ओरडतो ) रामा, लक्ष्मणा, त्या क्रूर कर्कशेचं वचन ऐकून कसे रे मला सोडून गेलांत ? तुमच्यावांचून मी कसा प्राण कंठूं ? माझा जीव तळमळत आहे. ( सुमन्त मंत्री येतो त्यास ) सुमंत, मला पाणी द्या. ( सुमंत त्याला पाणी पाजतो. ) पाण्याच्या शीतलतेनं हृदयाची आग कशी शमणार ? क्रूर स्त्रिये ! माझे दोन्ही हात कापून मागितले असतेस तरी मीं आनंदानं तुला दिले असते. भरताला राज्य मागायचं होतं तर वनवासाची अट कशाला घालायला पाहिजे होती ? त्या कनवाळू रामानं भरताच्या केसालाहि धक्का लावला नसता. आतां वैधव्य पदरांत घेऊन खुशाल राजमाता हो ! रामा, ये रे परत आणि मला कडकडून भेट ! ( लोळण घेतो. सुमन्त आणि राजवैद्य त्याची शुश्रूषा करीत असतां सूत्रधार पुढील पद्य म्हणतो. पद्य चालू असतां राजवैद्याचें पुढील भाषण होतें. )

**राजवैद्य :** सुमन्त, ती मात्रा उगाळा. महाराज, सावध व्हा. ( दशरथाची नाडी पहातां पहातां गम्भीर होतो ) अरे, यांची नाडी बंद कशी झाली ? ( दशरथाच्या नाकाला हात लावून ) अरे रे ! यांचा श्वासही बंद झाल्यासारखा दिसतो आहे. आतां ही विटकर उगाळण्याचा काय उपयोग आहे ?

**सूत्रधार :**

**भैरवी त्रिताल**

**घालविलें तुज रामा, मूढें सांडुनिया सुतप्रेमा ॥ धृ० ॥**
**वृद्ध दीन मी पाशिं यमाच्या**
**संनिध गेलों असतां ।**
**कुबुद्धियोगें शोकिं लोटली**
**अभिषेकातुर जनता ॥**
**नगरी अयोध्या अनाथ होइल**
**नाथावांचुनि ऐशा ।**
**ग्रस्त जाहलेल्या चंद्रासम**
**कान्तिहीन विफलाशा ॥ घालविलें...**

( सूत्रधार पद म्हणत असतां दशरथ हळूहळू गतप्राण होतो. )

**राजवैद्य :** ( सुमन्तास ) अहो सुमन्त, अरे गणेश ! ( सूत्रधारास ) जगन्नाथ ! मूर्खांनो, मी नाटकांतलं भाषण पाठ म्हणत नाहीं. हा दशरथाचाच काय, पण दशरथाचं काम करणाऱ्या नरहरिदासाचा प्राण त्याला सोडून गेला आहे. या इकडे लौकर ?

**सुमन्त** आणि **सूत्रधार :** ( खात्री करून घेऊन ) अरे रे, हें

काय भलतंच झालं ? अरे, पडदा सरकवा एकदम. ( उपनाटकाचा पडदा धांदलीनें सरकावण्यांत येतो. )

**गोपाळदास :** काय नरहरिदास खरोखरीच मेला ? नाटकांतल्या शोकानं पात्राचा प्राण खरोखरीच गेल्याचं हें उदाहरण आश्चर्यकारकच आहे म्हणायचं !

**अंबादास :** हेंच तें भूमिकेशीं तादात्म्य, नाहीं का ?

**न्यायाधीश :** हीच ती भूमिकेशीं तन्मयता. महाराज, आपण गोविंददासाच्या वधाबद्दल नरहरिदासाला जी शिक्षा योजिली, ती आपल्या बुद्धिमत्तेची साक्ष उत्कृष्ट प्रकारें पटवीत आहे.

**राजा :** नरहरीदासाला अप्रत्यक्ष रीतीनं देहान्त प्रायश्चित्त देण्याचं कटुकर्तव्य मला बजावावं लागलं खरं. तरी पण नरहरिदास ही व्यक्ति, तो एक थोर कलावंत आज आपल्यांतून नाहींसा झाला आहे. पण नटश्रेष्ठ म्हणून अजरामर कीर्ति त्यानं जिवाचं मोल देऊन विकत घेतली आहे. त्याच्या अंत्यविधीला आमचे सगळे राजकीय मानसन्मान मिळतील. नटश्रेष्ठाचा जयजयकार असो !

**पडदा**

म. ग्रं. सं. ठाणे,
क्र. 2079 ... नों. दि ...
IRBK-0102011
IRBK-0102011

देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार,
पुणें

मूल्य १२ आणे

पुढील प्रकाशन :

बुद्ध आणि हिटलर
—वि. स. खांडेकर